महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६४ दिनांक ०५ / १० / २०१७

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी २०१७ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दि.२१.०९.२०१७
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५६ दिनांक ११.०५.२०१७

........

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दि.२१.०९.२०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना ०१ जानेवारी २०१७ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर १३२% वरून १३६% केला आहे. तसेच सदर शासन निर्णयाद्वारे हा सुधारित दर दि. ०१ ऑगस्ट २०१७ पासून लागू करण्यात आला असून दिनांक ०१ जानेवारी २०१७ ते ३१ जुलै २०१७ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत शासनामार्फत स्वतंत्रपणे आदेश पारीत करण्यात येणार आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्त्याचा दर १३२% ऐवजी १३६% असा दि. ०१ जानेवारी २०१७ पासून सुधारित करण्याकरीता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारीत महागाई भत्त्याचा दर दि. ०१ ऑगस्ट २०१७ पासून लागू करण्यात यावा व माहे ऑगस्ट-२०१७ ते सप्टेंबर-२०१७ या कालावधीतील महागाई भत्त्यापोटीच्या फरकाची रक्कम माहे ऑक्टोबर-२०१७ च्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

४. उपरोक्त सुधारित दराने द्यावयाच्या दिनांक ०१ जानेवारी २०१७ ते ३१ जुलै २०१७ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या **R-APDRP Portal** वर उपलब्ध करण्यात आले आहे.

५/१०

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\D.A-Adm.Circular*